**नोंदणी व मुद्रांक विभागातील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील कर्मचाऱ्यांची सरळसेवा / पदोन्नती/ प्रतिनियुक्तीने नियुक्ती / पदस्थापना देण्याकरीता नियुक्ती प्राधिकारी घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र. आस्थाप-२०२३/१०३०/प्र.क्र.२११/म-१,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २३ फेब्रुवारी, २०२४.

**संदर्भ:-**१) शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२९०/कार्या-१२, दि.१९/११/२०१६.
२) शासन निर्णय क्र. महसूल व वन विभाग, क्र.आस्थाप-२०१६/प्र.क्र.८३८/म-१, दि.७/४/२०१७.

**प्रस्तावना:-**

शासकीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भात त्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणूका/ पदस्थापना करतांना संबंधित प्रकरणे कोणत्या स्तरापर्यंत सादर करावी व कोणत्या स्तरावर अंतिम निर्णय घ्यावेत, याबाबत विशिष्ट आदेश नसल्याने संदर्भ क्र.१ येथील दि.१९/११/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाने संदर संदिग्धता दूर केली. सदर शासन निर्णयानुसार, नोंदणी व मुद्रांक विभागातील, गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणूका/ पदस्थापना करणेकरीता संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्यात आले आहेत. तथापि, क्षेत्रीय कार्यालयांकडून उपस्थित केलेल्या बाबींच्या अनुषंगाने व प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदर शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

नोंदणी व मुद्रांक विभागातील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणूका/ पदस्थापना करतांना संबंधित प्रकरणी कोणत्या स्तरावर अंतिम निर्णय घ्यावेत याकरीता संदर्भ क्र.२ येथील दि.७/४/२०१७ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. नोंदणी व मुद्रांक विभागातील गट-ब (अराजपत्रित), गट-क आणि गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणूका/ पदस्थापना करतांना संबंधित प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यासाठी खालील प्रमाणे " नियुक्ती प्राधिकारी " घोषित करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदे | नियुक्ती प्राधिकारी |
|---|---|---|
| १ | दुय्यम निबंधक श्रेणी-१/मुद्रांक निरीक्षक, गट-ब (अराजपत्रित) सहाव्या वेतन आयोगानुार (पे बँड रु.९३००-३४८००+ग्रेड पे ४३००) या वेतनश्रेणीत वेतन घेणारे गट-ब (अराजपत्रित) चे अन्य कर्मचारी. | नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे |
| २ | वरिष्ठ लिपिक /पर्यवेक्षक (पे बँड रु.५२००-२०२००+ग्रेड पे २४००) या वेतनश्रेणीत वेतन घेणारे गट-क मधील कर्मचारी | |
| ३ | कनिष्ठ लिपिक (पे बँड रु.५२००-२०२००+ग्रेड पे १९००) व वाहनचालक (पे बँड रु.५२००-२०२००+ग्रेड पे १९००) या वेतनश्रेणीत वेतन घेणारे गट-क मधील कर्मचारी | |
| ४ | शिपाई (पे बँड रु.४४००-७४००+ग्रेड पे १३००) या वेतनश्रेणीत वेतन घेणारे गट-ड मधील कर्मचारी | |

३. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य,पुणे हे वर नमूद पदांकरीता सरळसेवेने, पदोन्नतीने, प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणूका/पदस्थापनेच्या प्रकरणांवर अंतिम निर्णय घेण्यासाठी सक्षम असतील. मात्र, संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदली करण्यासंदर्भात " महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ " च्या तरतुदीनुसार घोषित केलेले सक्षम प्राधिकारी अंतिम निर्णय घेतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०२२३१९१९५९७९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=1085617af371f507cb8ee4d914eb645d92480247b61bd58b5c3074ba3a6a62d7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2024.02.26 13:04:13 +05'30'

**( सत्यनारायण बजाज )**

**उपसचिव (मुद्रांक), महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
५) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६) सर्व मंत्रालयीन विभाग,
७) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) निवडनस्ती.